महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
५ वा मजला, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२७९६९१३ Email ID shrikant.yadav@nic.in

---

क्रमांक : संकिर्ण-११२५/प्र.क्र/८८ /का.३ दिनांक : ०९.०५.२०२५

प्रति,

मा.महाप्रबंधक ,
मा.उच्च न्यायालय,
मुंबई - ४०० ०३२.

विषय:- पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्ती

महोदय,

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ५१ मध्ये भू-संपादन, नुकसानभरपाई, पुनर्वसन व पुनर्वसाहतीसंबंधी उद्भवणाऱ्या वादांचे शीघ्र निराकरण करण्याच्या प्रयोजनार्थ भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद आहे. कलम ५२ नुसार भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शासनाच्या अधिसूचनेन्वये दि.११.०९.२०१९ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे प्राधिकरण स्थापन करण्यात आले. अधिनीयमाच्या कलम ५२ मध्ये प्राधिकरणाची रचना विहित करण्यात आली. प्राधिकरणाच्या कार्यासाठी "पीठासीन अधिकारी" (Presiding Officer) नेमण्याची तरतूद अधिनियमात आहे. कलम ५३ मध्ये पीठासीन अधिकाऱ्याच्या नियुक्तीबाबतची प्रक्रिया विहित केली आहे . कलम ५३(२) मध्ये प्राधिकरण ज्या उच्च न्यायालयाच्या क्षेत्राधिकारात आहे, त्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून पीठासीन अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

२. कलम ५३ मधील पोट कलम (१) व (२) मधील तरतुदीनुसार यापूर्वी शासन अधिसूचना दि. १४.०३.२०२२ अन्वये श्री. श्रीपाद दत्तात्रय टेकाळे, प्रमुख जिल्हा न्यायाधीश व सत्र न्यायाधीश, यांची पीठासीन अधिकारी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर या पदावर

नियुक्ती करण्यात आली होती त्यानुसार श्री . श्रीपाद दत्तात्रय टेकाळे यांनी पीठासीन अधिकारी पदाचा कार्यभार दि. ०४.०५.२०२२ स्वीकारला . त्यानुसार सदर पदावरील श्री. श्रीपाद दत्तात्रय टेकाळे यांचा 3 वर्षांचा कार्यकाळ दि.०४.०५.२०२५ रोजी संपुष्टात येणार आहे . याचिका ६३३०/२०२१ मध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय दि.१३.०२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये दिलेले निर्देश पाहता राज्यातील नाशिक, अमरावती, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील प्राधिकरणाचे न्यायिक कामकाज अखंडीतपणे सुरू असणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजीनगर येथील प्राधिकरणामध्ये ३१.०३.२०२५ रोजी कलम ६४ अन्वये दाखल असलेले ५७०९ संदर्भ प्रलंबित आहेत, ही बाब विचारात घेता त्यांचा जलद निपटारा होण्याकरिता पीठासीन अधिकारी या पदावर नियुक्तीसाठी सुयोग्य उमेदवाराची शिफारस विनाविलंब प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. अधिनियमाच्या कलम ५४ मध्ये पीठासीन अधिकारी पदाचा पदावधी निश्चित केला आहे.त्यानुसार पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत किंवा वयाची पासष्ट वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जी गोष्ट अगोदर घडेल त्या दिनांकापर्यंत पदग्रहण करता येईल असे नमूद केले आहे . सध्या नियुक्त करण्यात आलेल्या पीठासीन अधिकाऱ्यांना दि. ०४.०५.२०२५ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे. यास्तव , सदर प्रकरणी मा.मुख्य न्यायाधीश उच्च न्यायालय , मुंबई यांचेशी विचारविनिमय करून पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्तीसाठी जिल्हा न्यायाधीश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकाऱ्याचे नाव या विभागास लवकरात लवकर कळवण्याची विनंती महसूल व वन विभागाने केली आहे. त्याअनुषंगाने पीठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर या पदावर नियुक्तीसाठी जिल्हा न्यायाधीश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकाऱ्याचे नाव या विभागास लवकरात लवकर कळवण्याची विनंती करण्यात येत आहे.

आपला,

( श्री.च.यादव )
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन